जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे

संपादक मंडळ
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com

# पक्षाच्या राज्य कमिटीची हाक

## दुष्काळाच्या भीषण प्रश्नावर राज्यभर रान उठवा! मोदी सरकारच्या जनविरोधी पावलांचा प्रतिकार करा! विधानसभा निवडणुकांची जोरदार तयारी करा!

**डॉ. अशोक ढवळे**

महाराष्ट्रात यंदा निर्माण झालेल्या अवर्षण आणि दुष्काळाच्या भीषण प्रश्नावर रान उठवा, केंद्रातील नरेंद्र मोदी-प्रणित भाजप सरकारच्या प्रत्येक जनविरोधी पावलाचा रस्त्यावर येऊन प्रतिकार करा आणि तीन महिन्यांत होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांची जोरदार तयारी करा, अशी तीन मुख्य आवाहने २८-२९ जून २०१४ रोजी कॉ. बी. टी. रणदिवे स्मारक भवन, बेलापूर येथे भरलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कमिटीच्या बैठकीने केली. चंद्रपूरचे राज्य कमिटी सदस्य प्रा. रमेशचंद्र दहिवडे अध्यक्षस्थानी असलेल्या या बैठकीस पक्षाचे पॉलिटब्यूरो सदस्य खासदार सीताराम येचुरी आणि पक्षाचे केंद्रीय सचिवमंडळ सदस्य माजी खासदार निलोत्पल बसू यांनी मार्गदर्शन केले.

पक्षाच्या पॉलिटब्यूरोचे माजी सदस्य आणि तामिळनाडूतील पक्ष व सीटूचे ज्येष्ठ नेते कॉ. आर. उमानाथ, पक्षाचे केंद्रीय कमिटी सदस्य व महाराष्ट्र राज्य सचिवमंडळ सदस्य, सीटूचे अखिल भारतीय व राज्य उपाध्यक्ष तसेच गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिक कॉ. के. एल. बजाज, आणि नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत बंगालमध्ये शहीद झालेले कॉम्रेड्स यांना भावपूर्ण आदरांजली वाहून बैठकीची सुरुवात झाली.

### लोकसभा निवडणुकीचा आढावा

७-८ जून २०१४ रोजी दिल्लीत झालेल्या पक्षाच्या केंद्रीय कमिटी बैठकीने नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीचा जो आढावा घेतला, तो सीताराम येचुरींनी राज्य कमिटीसमोर मांडला व त्यावर गांभीर्याने राजकीय चर्चा व प्रश्नोत्तरे झाली. हा अहवाल 'जीवनमार्ग'च्या ह्याच अंकात प्रकाशित केला आहे.

लोकसभा निवडणुकांचा महाराष्ट्रातील आढावा व पुढील कार्ये, निवडणुकांनंतर राज्यात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी आणि आगामी विधानसभा निवडणुकांची तयारी हे तिन्ही विषय राज्य सचिवमंडळातर्फे राज्य सचिव डॉ. अशोक ढवळे यांनी मांडले व त्यांवर सविस्तर चर्चा होऊन ठोस निर्णय घेण्यात आले. लोकसभा निवडणुकांचा महाराष्ट्रातील आढावाही ह्याच अंकात प्रकाशित करत आहोत.

### मोदी सरकारच्या जनविरोधी पावलांचा निषेध

मोदी सरकारने शपथविधी घेऊन महिना झाला नाही, तोच सामान्य जनतेवर जी जबरदस्त रेल्वे दरवाढ लादली, तिचा तीव्र निषेध राज्य कमिटीने केला. मोदी सरकार अंबानी-अदानींसारख्या भल्यामोठ्या देणगीदारांना गडगंज नफे कमावून देऊन त्यांना खुश करण्यासाठी गॅस, डिझेल, केरोसीन या सर्व पदार्थांची भाववाढ करणार आहे. भाजपचे सरकार आल्यापासून सर्व जीवनावश्यक वस्तूंची महागाई भडकत चालली आहे.

रेल्वे भाडेवाढीच्या निषेधार्थ मुंबई, ठाणे, नाशिक, सोलापूर, लातूर, नंदुरबार, जळगाव, कोल्हापूर, सांगली, यवतमाळ, बुलडाणा, नांदेड आदि जिल्ह्यांत पक्षाने केलेल्या तातडीच्या प्रतिकार आंदोलनाबाबत राज्य कमिटीने या जिल्ह्यांचे अभिनंदन केले. यापुढे भाजप सरकारच्या प्रत्येक जनविरोधी पावलाचा प्रतिकार करण्यासाठी पक्षाने प्रत्येक जिल्ह्यात ताबडतोब स्वत: पुढाकार घेऊन व जनतेत व्यापक मोहीम राबवून अधिकाधिक लोकांना रस्त्यावर उतरविलेच पाहिजे, अशी हाक राज्य कमिटीने दिली.

### महाराष्ट्रातील दुष्काळाचा भीषण प्रश्न

महाराष्ट्रात अवर्षण आणि दुष्काळाचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. फेब्रुवारी-मार्च या काळात ठिकठिकाणी झालेली गारपीट आणि वादळामुळे लाखो शेतकरी-शेतमजुरांचे अतोनात नुकसान झाले आहे.

याउलट संपूर्ण जून महिना पावसाचा जवळजवळ थेंबही न पडता कोरडा गेला आहे. राज्यात बहुतेक ठिकाणी पहिली पेरणी वाया जाऊन दुबार पेरणीची वेळ आली आहे. शेतीच्या पाण्याबरोबरच पिण्याच्या पाण्याचे भीषण संकटही शहरांत आणि खेड्यांत आ वासून उभे झाले आहे. या सर्व परिस्थितीत दुष्काळी मागण्या घेऊन आंदोलनात त्वरित उतरण्याची हाक राज्य कमिटीने दिली.

## विधानसभा निवडणुकांची तयारी

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजप-शिवसेना महायुती, काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी आणि मनसे यांना विरोध असलेल्या सर्व डाव्या, लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष शक्तींना एकत्र करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे धोरण राज्य कमिटीने स्वीकारले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे आगामी विधानसभा निवडणुकीत लढवावयाच्या सुमारे २५ जागा राज्य कमिटीने निश्चित केल्या. डहाणू (अज), कळवण (अज) आणि सोलापूर मध्य या आपण आज वा पूर्वी जिंकलेल्या तिन्ही जागा जिंकण्यास सर्वतोपरी प्राधान्य देणे, आणि इतर जागांमध्ये अधिकाधिक चांगली कामगिरी करणे अशी उद्दिष्टे राज्य कमिटीने ठेवली. त्यासाठी संबंधित मतदारसंघांत स्थानिक प्रश्नांवर लढे, राजकीय प्रश्नांवर मोहिमा, कार्यकर्त्यांच्या संचाची क्रियाशीलता, बूथ कमिट्यांची स्थापना आणि निधी संकलन मोहिमेस चालना या पाच पैलूंवर तातडीने लक्ष देण्याची हाक राज्य कमिटीने दिली.

पक्षाच्या केंद्रीय व राज्य कमिटीचे लोकसभा निवडणूक विषयक अहवाल, विधानसभा निवडणुकांची तयारी आणि सद्यस्थितीतील राजकीय आव्हाने यांचे पक्ष सभासदांना रिपोर्टिंग करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जनरल बॉडी सभा जुलै महिन्यात आयोजित कराव्यात आणि संबंधित राज्य सचिवमंडळ सदस्यांनी त्यासाठी जावे असे ठरले.

## उपेक्षित समाजघटकांसाठी संघर्ष

सहा महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात राज्य मेळावे घेऊन स्थापन केलेल्या जाती अंत संघर्ष समिती, अल्पसंख्याक हक्क संघर्ष समिती आणि आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाच्या कार्याचा संक्षिप्त आढावा अनुक्रमे शैलेंद्र कांबळे, सईद अहमद आणि बारक्या मांगात यांनी मांडला. जाती अंत संघर्ष समितीच्या दोन राज्यस्तरीय बैठका झाल्या असून तिने आणि पक्षाने अलीकडे नगर जिल्ह्यात खर्डा व जालना जिल्ह्यात नानेगावमध्ये झालेल्या अनुक्रमे नितीन आगे व मनोज कसाब या दलित तरुणांच्या हत्याकांडांच्या घटनांत सामाजिक न्यायाच्या बाजूने चांगला पुढाकार घेतला आहे. तसेच भाजपचे केंद्र सरकार सत्तेवर आल्यानंतर पुण्यात मोहसीन शेख या मुस्लीम तरुणाची हिंदू राष्ट्र सेना या धर्मांध संघटनेने जी हत्या केली, त्यातही पक्षाने आणि अल्पसंख्यांक हक्क संघर्ष समितीने तातडीने हस्तक्षेप केला आहे. वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी व इतर प्रश्नांवर पक्ष, किसान सभा आणि आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाने आपला संघर्ष सुरू ठेवला आहे.

या सर्वांचा आढावा घेऊन राज्य कमिटीने पुढील निर्णय घेतले:- जुलै महिन्यात शक्य त्या सर्व जिल्ह्यांत वरील तिन्ही मंचांचे मेळावे आयोजित करून त्यांच्या जिल्हा समित्या निवडाव्यात; या मंचांच्या राज्य समित्यांवर ज्या जिल्ह्यांचे प्रतिनिधी नसतील त्यांचे एक-एक योग्य नाव संबंधित जिल्ह्यांनी त्वरित सुचवावे; विधानसभा निवडणुकांनंतर तिन्ही राज्य समित्यांच्या बैठका घेऊन पुढील कार्ये ठरवावीत; दलित-आदिवासी अत्याचार प्रतिबंधक कायद्याविषयीच्या निवेदनावर १ लाख सह्या जमा करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करावे; एससी-एसटी उपयोजना कायद्याकरता निवेदन मुख्यमंत्र्यांना सादर करावे व ऑगस्ट अखेरपर्यंत त्यावर प्रत्येक जिल्ह्यात आंदोलनात्मक कृती करावी; आणि सामाजिकदृष्ट्या उपेक्षित समाजविभागांचे प्रश्न हिरीरीने हाती घेत असतानाच कामगार-शेतकरी-शेतमजूर या आपल्या मूळ वर्गांच्या प्रश्नांवरही प्रभावी लढे उभारावेत.

## पक्ष नूतनीकरण, तरुणांच्या संघटनांवर भर

२०१४ सालचे पक्ष नूतनीकरण या बैठकीत अंतिम करण्यात आले. सर्व जिल्हा नूतनीकरण अहवाल आणि उर्वरित पक्ष लेव्ही १५ दिवसांत राज्य केंद्राला पोहोचलीच पाहिजे असे राज्य कमिटीने ठरविले.

जून महिन्यात मुंबईत झालेले विद्यार्थी आघाडीचे राज्य शिबिर आणि पुण्यात झालेले युवा आघाडीचे राज्य शिबिर यातील उपस्थितीचा राज्य कमिटीने टीकात्मक आढावा घेतला, या दोन्ही आघाड्यांचे सद्य परिस्थितीतील राजकीय महत्त्व अधोरेखित केले आणि प्रत्येक जिल्ह्यात या दोन्ही आघाड्यांना सक्रिय करून त्यांच्या राज्य कमिट्यांचे निर्णय कटाक्षाने अंमलात आणण्यासाठी मदत व मार्गदर्शन करण्याच्या सूचना सर्व जिल्हा कमिट्यांना दिल्या.

'जगण्याच्या हक्काचे आंदोलन' या संयुक्त मंचात पक्ष सहभागी आहे. त्याच्या आगामी बैठकीत ठरणाऱ्या जिल्हा स्तरावरील आंदोलनात्मक कार्यक्रमात पक्षाने चांगल्या संख्येने सहभागी व्हावे असे राज्य कमिटीने ठरविले.

विधानसभा निवडणुकीविषयी अंतिम निर्णय घेण्यासाठी ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात राज्य कमिटीची बैठक घ्यावी, व त्या बैठकीत सर्व जिल्हा कमिट्यांनी आपली सर्व प्रकारची थकबाकी चुकती करावी असा निर्णय घेऊन राज्य कमिटी बैठकीची सांगता झाली.

□□□

## (किसान कौन्सिलची हाक... पान ५ वरून)

गैरहजर असल्याने, तसेच हजर असलेल्या जिल्ह्यांतही काही सभासदसंख्या जमा करणे असल्याने २० जुलैपर्यंत सर्व सभासदसंख्या, तिची वर्गणी आणि काऊंटरफॉईल्ससह राज्य केंद्राला पोहोचविलीच पाहिजे असे ठरले. २४-२५ जुलैला दिल्लीत होणाऱ्या अखिल भारतीय किसान कौन्सिलच्या बैठकीत संपूर्ण देशाची सभासदसंख्या अंतिम केली जाईल.

किसान सभेच्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांच्या उत्तरदायित्वावर चांगली चर्चा होऊन दर महिन्याला प्रत्येक जिल्ह्यातील पूर्णवेळ कार्यकर्त्यांची वेगळी बैठक घेऊन त्यांच्या कामाचा आढावा घेणे आणि पुढील कामे ठरवून देणे, विधानसभा निवडणुकीनंतर राज्यातील सर्व पूर्णवेळ कार्यकर्त्यांची एक विशेष बैठक घेणे असे निर्णय घेण्यात आले. प्रत्येक जिल्हा व तालुका किसान कौन्सिलची बैठक दर महिन्याला एकदा झालीच पाहिजे आणि गावकमिट्या बांधून शेतकरी प्रश्नांवरील आंदोलनांद्वारे त्या सक्रिय ठेवण्यास प्राधान्य दिले पाहिजे असेही ठरले.

अखेरीस, ऑक्टोबर २०१४ मध्ये होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत शेतकरी-शेतमजूर-कामगारांच्या बाजूने लढणाऱ्या डाव्या पक्षांच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी अहोरात्र मेहनत करण्याचे ठरवून राज्य कौन्सिलची ही बैठक उत्साहात संपली.

□□□

# महाराष्ट्र राज्य किसान कौन्सिलची हाक

## ८ ते १५ जुलै : दुष्काळाच्या प्रश्नावर तीव्र आंदोलन उभारा!
## ३ ऑगस्ट : शेतकरी दिनी सर्वत्र सरकारविरोधी जोरदार सभा घ्या!
## इकोसेन्सिटिव्ह झोनच्या धोरणाविरुद्ध सह्यांची मोहीम सुरू करा!

किसन गुजर / डॉ. अजित नवले

३० जून २०१४ रोजी बेलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य किसान कौन्सिलच्या बैठकीने ८ ते १५ जुलै या काळात दुष्काळी मागण्यांवर राज्यव्यापी आंदोलनात्मक कृती करणे, ३ ऑगस्ट ह्या शेतकरी दिनी राज्यभर भाजप व काँग्रेस-प्रणित केंद्र व राज्य सरकारांच्या शेतकरीविरोधी धोरणांविरुध्द जोरदार जाहीर सभा घेणे, केंद्र सरकारच्या पश्चिम घाटातील विकासविरोधी इकोसेन्सिटिव्ह झोनच्या धोरणाविरुध्द संबंधित जिल्ह्यांत पत्रके काढून सह्यांची जोरदार मोहीम राबविणे, २० जुलैपर्यंत सर्व सभासद नोंदणी राज्य केंद्राकडे जमा करून २.५ लाखाचे उद्दिष्ट पूर्ण करणे, आणि आगामी विधानसभा निवडणुकीत शेतकरी हिताच्या बाजूने असलेल्या डाव्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करणे असे पाच कळीचे निर्णय घेतले.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य किसान सभेचे अध्यक्ष दादा रायपुरे हे होते आणि अखिल भारतीय किसान सभेचे सहसचिव डॉ. अशोक ढवळे यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीत नाशिक, ठाणे, रायगड, अहमदनगर, सांगली, सोलापूर, बीड, परभणी, नांदेड, जालना, बुलडाणा, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### दुष्काळविरोधी संघर्ष सप्ताहातील प्रमुख मागण्या

८ ते १५ जुलै या काळात दुष्काळाच्या प्रश्नावर पुढील मागण्यांवर राज्यव्यापी आंदोलनास चालना देण्याचे ठरले:-

१. लांबलेला पाऊस व वाया गेलेल्या पेरणी हंगामाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर त्वरित दुष्काळ जाहीर करा. २. पाणीटंचाईच्या भागात माणसे व जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची त्वरित पुरेशी व्यवस्था करा. ३. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची बँका, पतसंस्था व सावकारांकडील सर्व कर्जे माफ करा. ४. शेतकऱ्यांची वीजबिले थकबाकीसह माफ करा व वीजपुरवठा नियमित करा. ५. शेतकऱ्यांसाठी नव्याने पुरेशा प्रमाणात शून्य टक्के व्याजदराने कर्जपुरवठा करा. ६. पेरणी हंगाम शक्य असलेल्या ठिकाणी त्वरित गुणवत्तापूर्ण बियाणे, खते पुरेशा प्रमाणात उपलब्ध करा.७. अन्नसुरक्षा कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करा व दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्वांना पुरेशा प्रमाणात मोफत रेशन व रॉकेल वितरित करा. ८. रोजगार हमीची कामे राज्यभर त्वरित सुरू करा व त्यावर प्रतिदिन ३५० रुपये वेतन द्या. ९. दुष्काळानिमित्त विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करा. १०. राज्यभर जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करा. ११. राज्यभर झालेल्या वादळात व गारपिटीत नुकसान झालेल्यांना त्वरित नुकसान भरपाई द्या. १२. पर्यावरण व जैववैविध्याच्या रक्षणाच्या बहाण्याने राज्यातील २१३३ गावांत व देशभरातील ४१५६ गावांत जाहीर केलेल्या इकोसेन्सिटिव्ह झोन धोरणातील जनविरोधी तरतुदी त्वरित मागे घ्या.

### इकोसेन्सिटिव्ह झोनचे घातक धोरण

पश्चिम घाटातील जैववैविध्याचे रक्षण करण्याच्या नावाखाली केंद्र सरकारने माधव गाडगीळ समिती आणि त्यानंतर कस्तुरीरंगन समिती अशा दोन समित्या स्थापन केल्या. त्यांच्या शिफारशींचा विचार करून केंद्र सरकारने गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडू या ६ राज्यांतील ४,१५६ गावे निवडली. या गावांत शेतीत रासायनिक खते वापरण्यास बंदी; जनावरांचे गोठे, दूध व मांस प्रक्रिया उद्योग तसेच तेलबिया प्रक्रिया उद्योग उभारण्यास बंदी; दवाखाने, पुस्तकालय व शाळेच्या इमारती उभारण्यास बंदी; कसत असलेली जंगल जमीन कसणाऱ्यांच्या नावे करण्यास बंदी; जंगलातून हिरडा, वनौषधी व मध गोळा करण्यास बंदी; अशा भयानक तरतुदी आहेत.

यापैकी सर्वाधिक २१३३ गावे महाराष्ट्रात आहेत, त्यांची जिल्हानिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे - रायगड-३५६, पुणे-३३७, सातारा-२९४, रत्नागिरी-२९२, ठाणे-२६१, सिंधुदुर्ग-१९२, कोल्हापूर-१८४, नाशिक-१५६, अहमदनगर-४२, सांगली-१२, धुळे-५, नंदुरबार-२.

या प्रश्नावर वरील जिल्ह्यांत प्रभावी पत्रके काढून सभा-बैठका घेऊन प्रचार करावा आणि केंद्र सरकारच्या या शेतकरीविरोधी कारस्थानाविरुध्द त्या गावांत जोरदार सह्यांची मोहीम घ्यावी असे राज्य कौन्सिलने ठरविले.

### ३ ऑगस्टचा शेतकरी दिन

३ ऑगस्ट हा महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीतील एक ऐतिहासिक दिवस आहे. महाराष्ट्र राज्य किसान सभेचे संस्थापक सरचिटणीस कॉ. शामराव परुळेकरांचा तो स्मृतिदिन आहे आणि अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष असलेले क्रांतिसिंह कॉ. नाना पाटील यांचा तो जयंती दिन आहे. महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या मागील अमरावती राज्य अधिवेशनाने हा दिवस दरवर्षी महाराष्ट्रभर 'शेतकरी दिन' म्हणून साजरा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. यंदा हा दिवस भाजप व काँग्रेस प्रणित केंद्र आणि राज्य सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात हजारो पत्रके छापून आणि अधिकाधिक जाहीर सभा घेऊन साजरा करावा असे किसान कौन्सिलने ठरविले.

### संघटनेच्या बळकटीसाठी निर्णय

महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या सभासदसंख्येने या राज्य कौन्सिल बैठकीपर्यंत पुन्हा एकदा २ लाखाची सीमा पार केली. पण काही जिल्हे

*(पान ४ पहा)*

# पक्षाच्या केंद्रीय कमिटीचा लोकसभा निवडणूक आढावा

*मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय कमिटीच्या नवी दिल्ली येथे ७-८ जून २०१४ ला झालेल्या बैठकीने स्वीकारलेला*

सोळाव्या लोकसभा निवडणुकीने राजकीय परिस्थितीत महत्वाचे स्थित्यंतर घडून आले आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील आघाडीला मोठे बहुमत मिळाले आहे. हिंदुत्ववादी विचारसरणीवर आधारलेल्या पक्षाला लोकसभेत संपूर्ण बहुमत प्रथमच मिळाले आहे. यातून देशाचे राजकारण उजवीकडे सरकले आहे. त्याचे मोठे राजकीय परिणाम संभवतात.

## भाजपचा मोठा विजय

भाजपने स्वत: २८२ जागा जिंकल्या असून रालोआने ३३६ जागा जिंकल्या आहेत. १९८४ च्या निवडणुकीनंतर प्रथमच कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळाले आहे. तसेच १९७७ मध्ये जनता पक्षाला मिळालेल्या विजयानंतर लोकसभेत एका बिगर-काँग्रेस पक्षाला प्रथमच बहुमत मिळाले आहे. भाजपला ३१ टक्के मते मिळून स्पष्ट बहुमत मिळाले आहे. २००९च्या १८.८ टक्क्यांच्या तुलनेत ही १२.२ टक्के वाढ असली तरी कुठल्याही बहुमत मिळालेल्या पक्षाला मिळालेली ही सर्वात कमी मते आहेत. 'रालोआ'स ३७.३ टक्के मते मिळाली आहेत.

ज्या ठिकाणी भाजप परंपरेने बळकट राहिला आहे, आणि जेथे त्याचा मुख्य प्रतिस्पर्धी काँग्रेस होता, अशा ठिकाणी भाजपने दणदणीत विजय मिळवला आहे. गुजरात आणि राजस्थानात भाजपला सर्वच्या सर्व म्हणजे अनुक्रमे २६ आणि २५ जागा मिळाल्या. मध्य प्रदेशात त्याला २९ पैकी २७, छत्तीसगडमध्ये ११ पैकी ९ आणि दिल्लीत सर्वच्या सर्व ७ जागा मिळाल्या.

भाजपला विलक्षण यश मिळाले ते उत्तर प्रदेशात. ८० पैकी ७१ जागा जिंकून त्याने अभूतपूर्व असे यश संपादन केले. शिवाय तेथील दोन जागा त्याच्या आघाडीतील पक्षाला मिळाल्या. उत्तर प्रदेशात भाजपला एकूण ४२.३ टक्के मते मिळाली. बिहारमध्ये भाजप आणि त्याच्या मित्र पक्षांना मिळून ४० पैकी ३१ जागा मिळाल्या.

देशाच्या इतर भागातही नरेंद्र मोदी आणि भाजपच्या दिशेने कल दिसून आला. महाराष्ट्रात भाजप-शिवसेना आघाडीने ४८ पैकी ४२ जागा जिंकल्या. झारखंडमध्ये १४ पैकी १२, कर्नाटकात २६ पैकी १७ आणि अगदी आसाममध्येदेखील त्याला १४ पैकी ७ जागा मिळाल्या.

या निवडणुकीत भाजपला नवे सहकारी जोडण्यात यश आले. आंध्रप्रदेश-तेलंगणात तेलगू देसम्, बिहारमध्ये लोक जनशक्ती पक्ष आणि राष्ट्रीय लोक समता पक्ष, तामिळनाडूमध्ये डीएमडीके, पीएमके आणि एमडीएमके आणि उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि ईशान्येत जाती-आधारित छोटे-छोटे पक्ष भाजपने आघाडीत घेतले. नरेंद्र मोदी आणि भाजप यांच्या आवाहनाची व्याप्ती वाढायला या मित्रांची मदत झाली.

## काँग्रेसची धूळधाण

या निवडणुकीत काँग्रेसविरोधी लाट होती. काँग्रेस पक्षाला केवळ ४४ आणि संपुआला ६० जागा मिळवता आल्या. त्या पक्षाची आजवरची ही सर्वात वाईट कामगिरी होय. याआधीची काँग्रेसची सर्वात कमी संख्या होती १९९९ची ११९. २००९ साली काँग्रेसला २८.६ टक्के मते मिळाली होती. ती या वेळी १९.३ टक्के इतकी घसरली आहेत.

संपुआ सरकारची लोकविरोधी राजवट म्हणजे दीर्घकाळ असलेली महागाई, शेतीवरील संकट, बेरोजगारी आणि अमर्याद भ्रष्टाचार यांची बजबजपुरीच होती. त्यामुळे देशभर काँग्रेसविरोधाची लाट उसळली होती.

## भाजपची प्रचार मोहीम

लोकांच्या या असंतोषाचे वारे आपल्या शिडात भरून भाजपला मोठा विजय मिळवता आला. नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून पुढे करण्यात त्या पक्षाला यश आले. त्या पक्षाने अपूर्व अशी एक राष्ट्रव्यापी, जोमदार मोहीम उघडली, आणि गुजरातच्या विकास मॉडेलचे ढोल बडवत देशभर ते राबवण्याची क्षमता असलेला नेता म्हणून नरेंद्र मोदींना पुढे करण्यात यश मिळवले. मात्र, कार्यक्षम प्रशासन आणि गुजरात मॉडेलच्या धर्तीवरील विकास यांच्या मुलाम्याखाली रा. स्व. संघाने चालवलेली अतिशय धर्मांध मोहीम दडवण्यात आली होती. शहरे आणि खेडी अशा सर्व ठिकाणी घरोघर जाऊन प्रचार करण्यासाठी रा. स्व. संघाने आपले सर्व सामर्थ्य वापरले. यामुळे विशेषत: उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांत धर्मांध ध्रुवीकरण होऊन त्या पक्षाच्या पाठीशी वरिष्ठ जाती एकजुटीने उभ्या राहिल्या. मागास जातींच्या लक्षणीय विभागांचा पाठिंबाही या पक्षाला मिळवता आला

स्वत: नरेंद्र मोदी यांनी प्रचारात हिंदुत्ववादी प्रतिकांचा वापर करून रा. स्व. संघाचे मुद्दे सढळपणे वापरले. प. बंगाल आणि आसाममधील तथाकथित बांगलादेशी घुसखोरांचा कडवटपणे वापरलेला मुद्दा, गोहत्येच्या रोखाने वापरलेली 'गुलाबी क्रांती' ची भाषा आणि रामाच्या नावाचा वापर यांचा उपयोग धर्मांध आवाहनासाठी केला. नरेंद्र मोदींनी वाराणसीतून निवडणूक लढवण्याचा निर्णयदेखील उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये हिंदुत्ववादी भावना उद्दीपित करण्यासाठीच घेण्यात आला होता.

## बड्या उद्योगांचा पाठिंबा

संपूर्ण बडे उद्योजक आणि कॉर्पोरेट जग मोदींच्या पाठीशी उभे राहिल्याचा मोठा परिणाम झाला. कॉर्पोरेट प्रसारमाध्यमांनी ज्या तीव्र स्वरात मोदींचा प्रचार केला, त्यात हे दिसून आले. टेलिव्हिजन, वृत्तपत्रे आणि रेडियो तसेच भले मोठे फलक यांच्यावर अभूतपूर्व असे अब्जावधी रुपये खर्चण्यात आले. टेलिव्हिजन या प्रभावी माध्यमाचा वापर करून मोदींच्या सभा लाईव्ह दाखवण्यात आल्या. मोदींचा संदेश अगदी दूरच्या खेड्यापर्यंत पोचवायचे काम टेलिव्हिजनने केले. सुशिक्षित तरुणांपर्यंत पोचण्यासाठी सोशल मीडियाचा परिणामकारक वापर करण्यात आला. अध्यक्षीय पध्दतीच्या या मोहिमेला कॉर्पोरेट प्रसारमाध्यमांनी मोठी मदत केली.

देशभरचा मध्यमवर्ग आणि तरुण वर्ग यांच्यावर मोदी मोहिमेने सर्वात जास्त प्रभाव टाकला. या दोन महत्वाच्या समाजघटकांमुळे समाजाच्या इतर थरातही मोदींच्या बाजूने प्रवाह निर्माण झाला.

## बिगर-काँग्रेस आणि बिगर-भाजप पक्ष

या गटापैकी तीन पक्षांनी चांगली कामगिरी केली. तामिळनाडूत अण्णा द्रमुकने ३९ पैकी ३७ जागा, ओडिशात बिजू जनता दलाने २१ पैकी २० आणि प. बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने ४२ पैकी ३४ जागा जिंकल्या. तेलंगणच्या निर्मितीचा तेलंगण राष्ट्र समितीस फायदा होऊन तिला १७ पैकी ११ जागा मिळाल्या.

उत्तर प्रदेशात सपाला आधीच्या २३च्या जागी फक्त ५ जागा मिळाल्या तर बसपला एकही जागा मिळाली नाही. बिहारमध्ये संयुक्त जदला १९च्या जागी २च जागा मिळाल्या. आसाम गण परिषदेच्या हाती सलग दुसऱ्या वेळी भोपळा आला. धर्मनिरपेक्ष जदला मागच्या प्रमाणेच २ जागा तर आंध्र प्रदेशात वायएसआर काँग्रेसला ९ जागा मिळाल्या.

आम आदमी पक्षाने ४३२ जागा लढवल्या आणि त्याला एकूण मतांच्या २ टक्के मते पडली. त्याने पंजाबमध्ये २४.४ टक्के मते मिळवत ४ जागा जिंकल्या. दिल्लीत त्या पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही. मात्र, मागच्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या मतांत ४ टक्के वाढ होऊन या वेळी ३३ टक्के मते मिळाली. जी मते डाव्यांना मिळायला हवी होती अशा काही मतदारसंघात आणि विभागांत 'आप'ला मते मिळाली. पंजाब, हरयाणा, उ. प्रदेश, उत्तराखंड येथील जागांत माकप उमेदवारांहून अधिक मते या पक्षाच्या उमेदवारांना मिळाली. राजस्थानातील तीनपैकी दोन जागी आणि हिमाचल प्रदेशातील शिमल्यातही 'आप'च्या उमेदवाराला आपल्याहून जास्त मते मिळाली. काही भागांमध्ये नवे मतदार व मध्यम वर्गाला तो आकर्षित करू शकला.

## निवडणुकीतील डावपेच

विसाव्या पक्ष काँग्रेसमध्ये स्वीकारलेल्या राजकीय-डावपेचात्मक धोरणानुसार केंद्रीय समितीने निवडणूक विषयीचे धोरण ठरविले होते. काँग्रेस आणि भाजप या दोन्हींच्या विरोधात लढून माकप आणि डाव्यांचे प्रतिनिधित्व वाढवणे, हे ते धोरण होते. समान कार्यक्रमावर आधारित तिसऱ्या आघाडीचा पर्याय शक्य नसल्याचे २०व्या काँग्रेसने सांगितले होते. त्याऐवजी बिगर-काँग्रेस धर्मनिरपेक्ष पक्षांसोबत संयुक्त कृती घडवून आणावी, आणि गरज असेल तेथे त्यांच्यासोबत निवडणूक समझोता करावा, डावा आणि लोकशाहीवादी पर्याय उभा करण्यासाठी काम करावे, असे निर्देश दिले होते.

लोकसभा निवडणुकीत आपण स्वीकारलेली नीती या राजकीय डावपेचात्मक धोरणावर आधारलेली होती. आपण स्वीकारलेल्या प्रमुख घोषणा होत्या - काँग्रेसला नाकारा; भाजपचा पराभव करा; धर्मनिरपेक्ष लोकशाही पर्यायासाठी डाव्या शक्ती मजबूत करा.

भाजप आणि धर्मांध शक्तींच्या वाढत्या धोक्यावरदेखील आपण विशेष लक्ष केंद्रित केले होते. दिल्ली येथे ३० ऑक्टोबर २०१३ रोजी आपण धर्मांधतेविरुध्द राष्ट्रीय परिषद आयोजित केली होती, तीत १३ पक्ष सहभागी झाले होते. त्या पाठोपाठ काही राज्यांमध्ये अशाच परिषदा झाल्या. पण त्या डाव्या पक्षांपर्यंतच मर्यादित राहिल्या.

निवडणूक मोहिमेदरम्यान काँग्रेसची पिछेहाट आणि भाजपची सरशी होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे आपण भाजपविरुध्दची मोहीम तीव्र केली, पण ती प्रभावी होऊ शकली नाही. याचे कारण बहुतेक राज्यांत आपली शक्ती मर्यादित होती.

निवडणुकीपूर्वी देशाच्या स्तरावर बिगर-काँग्रेस धर्मनिरपेक्ष गट उभा राहायला वाव नव्हता, हे ध्यानात घेऊन आपण तामिळनाडू, ओडिशा, बिहार आणि आंध्र प्रदेशात काही प्रादेशिक पक्षांसोबत निवडणूक समझोता करायचा प्रयत्न केला, पण हेदेखील प्रत्यक्षात येऊ शकले नाही. निवडणूक झाल्यावर धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी पर्याय देण्याच्या भूमिकेवर (चार डाव्या पक्षांसह) ९ पक्षांना आणण्यात आपल्याला यश आले. परंतु हा प्रयत्नदेखील अण्णा-द्रमुक आणि डाव्या पक्षांतील निवडणूक आघाडी फिस्कटल्यानंतर परिणामकारक राहिला नाही.

राष्ट्रीय स्तरावरील बिगर-काँग्रेस धर्मनिरपेक्ष विश्वासार्ह पर्यायाच्या अभावाचा भाजपला लाभ झाला. लोकांच्या मनातून उतरलेल्या काँग्रेसला आपणच पर्याय आहोत, असे दाखवणे भाजपला शक्य झाले.

आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवल भारताला जास्त आक्रमकपणे नवउदार धोरणाकडे ढकलायच्या वळणावर असताना या निवडणुका झाल्या. नवउदारवादाची बांधिलकी स्वीकारलेला कॉर्पोरेट वर्ग अरिष्टात सापडलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी हाच मार्ग सुचवत होता. या बाह्य आणि अंतर्गत अशा दोन्ही शक्ती डाव्यांना अलग पाडायचा जिकीरीने प्रयत्न करत होत्या.

## माकपची कामगिरी

माकपने ९ जागा जिंकल्या - ५ केरळ, २ त्रिपुरा आणि २ प. बंगालमध्ये. आपल्या पक्षाने व डाव्या आघाडीने पाठिंबा दिलेले दोन अपक्ष केरळमधून निवडून आले आहेत. कोणत्याही लोकसभा निवडणुकीत माकपला मिळालेल्या या सर्वात कमी जागा होत.

पक्षाने ९३ जागा लढवून ३.२ टक्के मते मिळविली. केरळमध्ये पाठिंबा दिलेल्या ५ अपक्ष उमेदवारांची मते धरल्यास हे प्रमाण ३.७ टक्केंपर्यंत जाते. २००९ मध्ये पक्षाला ५.३ टक्के मते मिळाली होती. ही टक्केवारी पक्षाला आजवर मिळालेल्या टक्केवारीत सर्वात कमी आहे.

डाव्या आघाडीपैकी आपण सोडून भाकपला केरळमध्ये एक जागा मिळाली. १२ जागा आणि ४.५ टक्के मते ही डाव्या आघाडीची आजवरची सर्वात वाईट कामगिरी आहे.

## राज्यनिहाय कामगिरी

### पश्चिम बंगाल

माकप आणि डाव्या आघाडीसाठी निकाल हादरवून टाकणारे आहेत. आघाडीपैकी फक्त माकपला २ जागा मिळाल्या. तृणमूल काँग्रेसला ३४, काँग्रेसला ४ आणि भाजपला २ जागा मिळाल्या. मतांच्या टक्केवारीत डाव्या आघाडीला २९.६१ टक्के (त्यापैकी माकपला २२.७१ टक्के), तृणमूलला ३९.६१ टक्के, काँग्रेसला ९.५८ टक्के आणि भाजपला १६.८४ टक्के मते मिळाली.

मतदानातील व्यापक गैरप्रकार हे या धक्कादायक पराभवामागील एक महत्वाचे कारण आहे. मतदान केंद्रे ताब्यात घेण्यात आली. मतदारांना धमकावण्याचे आणि हिंसक हल्ले करण्याचे असंख्य प्रकार झाले. १९ जिल्ह्यांतील ७७,२४१ मतदान केंद्रांपैकी सुमारे १०,००० केंद्रांवर गैरप्रकारांचा परिणाम दिसून आला. उर्वरितपैकी ७,००० केंद्रांवरही काही अंशी याचा परिणाम दिसून आला.

पण पराभवाचे हेच काही एकमेव कारण नाही. कित्येक विभागात गमावून बसलेला जनाधार परत मिळवण्यात पक्षाला वा डाव्या आघाडीला यश आले नाही. ही घसरण २००८ च्या पंचायत निवडणुकांपासूनच सुरू झाली होती आणि ती पुढे चालूच राहिली. जेथे पक्षाचा आधार कायम राहिला होता आणि काही ठिकाणी प्रगती केली होती अशा ठिकाणी नेम धरून दहशत बसवण्यात आली. मतदान केंद्रांवर व्यापक गैरप्रकार करण्यात आले. या ठिकाणी आपले कार्यकर्ते आणि पाठीराखे यांच्यावर होत असलेले हल्ले आपण रोखू शकलो नाही.

असे असले तरी, पक्षाच्या हजारो कार्यकर्त्यांनी आणि पाठीराख्यांनी हल्ल्यांना तोंड देत धीराने निवडणूक मोहीम राबवली. लोकांना मतदानासाठी संघटित केले. निवडणूक मोहीम आणि नंतरच्या हिंसक हल्ल्यात १० कॉम्रेड्स ठार झाले. यात दोन महिलांचाही समावेश होता.

निवडणूक न्याय्य आणि मुक्त वातावरणात घडवून आणण्यास निवडणूक आयोग संपूर्णत: अपयशी ठरला. त्याला निवडणूक यंत्रणेचे अबाधित्व राखता आले नाही.

मतांची टक्केवारी पहाता तृणमूलला २०११च्या विधानसभा निवडणुकीतील टक्केवारी राखता आली आहे. पण गैरप्रकार आणि हिंसाचार झाला नसता तर त्या पक्षाला ३४ जागा आणि इतकी टक्केवारी मिळवता आली नसती. डाव्या आघाडीची परिस्थिती सुधारली असती. त्यामुळे निकालात लोकमताचे पूर्ण प्रतिबिंब पडलेले नाही.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे १७ टक्के मते मिळवणाऱ्या भाजपची कमाई. त्याला २ जागा मिळाल्या. ३ ठिकाणी तो दुसरा आला आणि २० मतदारसंघात त्याला प्रत्येकी २ लाखाहून जास्त मते पडली.

बांगलादेशातून आलेल्या निर्वासितांच्या प्रश्नावर नरेंद्र मोदी आणि ममता बॅनर्जी यांच्यात शाब्दिक चकमकी घडल्या. याचा दोघांनाही मते मिळवण्यात लाभ झाला. मुस्लिमांतील काही विभाग तृणमूलच्या पाठीशी आणि काही हिंदू विभाग भाजपच्या पाठीशी राहिले. लोकांना वाटणारे भाजपचे आकर्षण कमी लेखल्यामुळे आपली मोहीम मुख्यत: तृणमूलविरुध्दच राहिली. आपल्याला भाजपचा धोका आणि मोदींच्या मोहिमेचा प्रभाव पूर्णपणे जोखता आला नाही. तृणमूलविरोधी मतातील काही हिस्सा आपल्याकडे खेचण्यात त्यांना यश आले. याशिवाय, डाव्या पक्षांचा आधार असलेल्या मतदारांनीही काही प्रमाणात भाजपला मतदान केले.

निवडणुकीतील पराभवाची प्रमुख कारणे राजकीय आणि संघटनात्मक आहेत. त्यातील काही राज्य समितीच्या निवडणूक आढाव्यात आली आहेत. तृणमूलच्या राजवटीत लोकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष आणि आंदोलन करण्यातील अपयश, हे एक मुख्य कारण होय. व्यापक पायावरील आंदोलने आणि संघर्ष करण्यात वर्गीय संघटना आणि जनसंघटना अपयशी ठरल्या आहेत. या दारुण पराभवापासून पक्षाने योग्य ते निष्कर्ष काढून योग्य ती उपाययोजना करायला हवी. होत असलेले हल्ले परतवण्यासाठी, पक्ष कार्यकर्त्यांचे संरक्षण करण्यासाठी, लोकांचे प्रश्न घेण्यासाठी आणि मूलभूत वर्गांची आंदोलने उभारण्यासाठी पक्षाने राजकीय आणि संघटनात्मक उपाययोजना केल्या पाहिजेत.

### केरळ

केरळमध्ये २० जागांपैकी डाव्या लोकशाही आघाडीने ८ आणि संयुक्त लोकशाही आघाडीने १२ जागा जिंकल्या. त्यात माकपच्या ५, भाकपची १ आणि पक्षाने पाठिंबा दिलेल्या अपक्षांच्या २ जागांचा समावेश आहे.

डाव्या लोकशाही आघाडीची मते वाढून संयुक्त लोकशाही आघाडीची मते कमी झाली आहेत. २००९च्या लोकसभा निवडणुकीत आपल्या आघाडीला ६७,१७,४३८ (४१.९५ टक्के) मते होती. ती २०१४ मध्ये झाली आहेत ७२,१०,५८१ (४०.१७ टक्के). संयुक्त लोकशाही आघाडीची २००९ मध्ये ७६,५३,१८९ (४३.४६ टक्के) मते होती, ती आता झाली आहेत ७५,४२,६८६ (४२.०२ टक्के). डाव्या लोकशाही आघाडीच्या मतांत ४,९३,१४३ मतांची वाढ झाली आहे व संयुक्त लोकशाही आघाडीच्या मतांत १,१०,५०३ मतांची घट झाली आहे.

२००९ मध्ये पक्षाने जिंकलेल्या ४ जागांशिवाय इतर ६ जागा मिळतील अशी पक्षाला अपेक्षा होती. यापैकी फक्त कन्नूरची जागा जिंकता आली. त्यासोबतच काही स्थानिक अनुकूल कारणांमुळे डाव्या लोकशाही आघाडीला थ्रिसूर, चलकुडी आणि इडुक्की या जागा जिंकता आल्या.

पण काँग्रेसच्या आघाडीला बहुसंख्य जागा राखता आल्या. देशभर असलेली काँग्रेसविरोधी लाट केरळमध्ये नव्हती. मुस्लिम आणि ख्रिश्चन हे दोन्ही अल्पसंख्याक संयुक्त लोकशाही आघाडीसोबत राहिले. इडुक्की, चलकुडी आणि थ्रिसूर येथे ख्रिश्चन अल्पसंख्य काही स्थानिक कारणांमुळे डाव्या लोकशाही आघाडीकडे आलेले दिसतात. कस्तुरीरंगन समितीला असलेला विरोध इडुक्कीमधील कारण आहे. चलकुडीच्या उमेदवारामुळे ती जागा मिळाली. थ्रिसूरमध्ये कॅथलिक चर्च आणि संयुक्त लोकशाही आघाडी दरम्यान काही प्रश्न निर्माण झाले होते. त्याचा आपल्याला लाभ झाला. लहान-मोठ्या जातीय संघटनांनी संयुक्त लोकशाही आघाडीला मदतकारक भूमिका घेतली. त्या आघाडीने निवडणुकीत पैशाचा मोठा वापर केला.

आपली आघाडी सोडून क्रांतिकारी समाजवादी पक्ष विरुध्द आघाडीत सामील झाला. याचा आपल्या आघाडीवर परिणाम झाला. उर्वरित आघाडीत मात्र एकजूट राहिली.

भाजपला २००९ मध्ये १०,३१,२७४ (६.४९ टक्के) मते होती. ती यावेळी १९,४३,६०७ (१०.८३ टक्के) झाली. 'आप'ला २,५६,६६२ तर 'नोटा'च्या पारड्यात २,१०,५६३ मते पडली.

पक्षाच्या हिंदू मतांत घट होऊन ती भाजपकडे गेली आहेत. तरुण आणि मध्यमवर्गाच्या एका विभागाला आकर्षित करण्यात भाजपला यश आले. हे रोखण्यासाठी पक्षाला प्रयत्न करावे लागतील.

अनुकूल राजकीय परिस्थिती असतानाही डालोआला काही लक्षणीय यश मिळवता आले नाही. कोल्लम, अलापुझा आणि कोझीकोड येथे संघटनात्मक कमजोऱ्या दिसून आल्या.

### त्रिपुरा

प्रचंड मताधिक्याने पक्षाने येथील दोन्ही जागा जिंकल्या. पूर्व त्रिपुराची जागा ४,८४,३५८ आणि पश्चिम त्रिपुराची जागा ५,०३,४८६ मताधिक्य मिळवून जिंकली. डाव्या आघाडीला एकूण मतांपैकी ६४.४ टक्के मते पडली. सर्वच्या सर्व ६० विधानसभा मतदारसंघांत डाव्या आघाडीच्या उमेदवारांना आघाडी मिळाली. त्यापैकी ५८ मतदारसंघांत ५० टक्केहून अधिक मताधिक्य मिळाले. या विलक्षण यशाबद्दल त्रिपुराचा पक्ष, डावी आघाडी, कार्यकर्ते आणि अनुयायी यांचे अभिनंदन करायलाच हवे.

पक्षाला मिळालेल्या वाढत्या पाठिंब्याला तेथील डाव्या आघाडीच्या सरकारने केलेले काम कारणीभूत आहे. यासोबतच, पक्ष सातत्याने राजकीय आणि जनतेच्या प्रश्नांवर आंदोलने करत काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या प्रचाराला चोख उत्तर देत आला आहे.

### आंध्रप्रदेश

तेलंगणात पक्षाने नलगोंडा (५४,४२३ मते, ४.६ टक्के) आणि भोंगीर (५४,०४० मते, ४.५ टक्के) जागा लढवल्या होत्या. विधानसभेसाठी आपण ३१ जागा लढवल्या आणि १.५५ टक्के मते पडली. पक्षाने अनुसूचित जमातीची भद्राचलम ही जागा ५७,७५० मते घेऊन जिंकली. वाय.एस.आर. काँग्रेससोबत केलेल्या स्थानिक समझोत्यामुळे ही जागा जिंकता आली. यानंतरची दोन नंबरची जागा होती खम्मम जिल्ह्यातीलच मधीरा ही. तेथे आपण दुसऱ्या स्थानावर असून पडलेली मते आहेत ५२,८०६. तेलंगणात भाकपची काँग्रेससोबत तडजोड होती.

आंध्रप्रदेशात आपण अरुकू (अनुसूचित जमाती) आणि तिरुपती या दोन जागा लढवल्या होत्या. तेथे प्रत्येकी ३८,८९७ (४.३ टक्के) आणि ११,१६८ (०.९ टक्के) मते मिळाली. विधानसभेसाठी आपण ३१ जागा लढवल्या आणि फक्त ०.४ टक्के मते मिळाली. पक्षाच्या परंपरागत जनाधारात मोठी घट झाली आहे. पैसा, जात आणि सामाजिक दडपण या बाबी कारणीभूत

झाल्याचा निष्कर्ष पक्षाच्या राज्य समितीच्या आढाव्यात काढण्यात आला आहे. भाकपसोबत कसलाही समझोता नव्हता आणि त्या पक्षाने आपल्याविरुध्द १३ विधानसभा मतदारसंघांत उमेदवार उभे केले होते.

**तामिळनाडू**

माकप (९ जागा) आणि भाकपने (९ जागा) एकत्र निवडणूक लढवली. पक्षाला सर्वात जास्त म्हणजे ३५,२८४ (३.६ टक्के) मते कन्याकुमारीत मिळाली. त्या पाठोपाठ कोईम्बतूर ३४,१९७ (२.९ टक्के), मदुराई ३०,१०८ (३.१ टक्के) आणि चेन्नई (उत्तर) २३,७५१ (२.६ टक्के) अशी मते मिळाली. मोहिमेच्या सुरुवातीलाच अण्णा द्रमुकसोबतची निवडणूक आघाडी मोडली. तयारीला वेळ कमी पडला आणि त्याचा आपल्या मोहिमेवर परिणाम झाला. माकप आणि भाकप प्रथमच स्वतंत्ररित्या आघाडी करून लढले. त्याने कार्यकर्ते आणि अनुयायी यांच्यात उत्साह आला; परंतु मते मात्र अपेक्षेइतकी मिळाली नाहीत.

आपण द्रमुक आणि अद्रमुक यांच्याशी आघाडी न करता याआधी निवडणूक लढलो होतो १९९८ साली. त्यावेळी आपण मदुराई आणि कोईम्बतूर या दोन जागा लढवल्या होत्या आणि मते मिळाली होती अनुक्रमे १,१०,००० आणि ५०,०००. या दोन्ही ठिकाणी आपली मते मोठ्या प्रमाणावर खाली आली आहेत. याचा अर्थ आपली स्वतंत्र ताकद खालावली आहे. गेल्या ४० वर्षात सतत द्रमुक अथवा अद्रमुकसोबत आघाडी केल्याने पक्षाच्या वाढीवर आणि राजकीय प्रभावावर परिणाम झाला आहे काय, हे तपासावे लागेल.

**महाराष्ट्र**

पक्षाने चार जागा लढवल्या, त्यापैकी पालघर (अज) - ७६,८९०, दिंडोरी (अज) - ७२,५९९, नाशिक - १७,१५४ आणि हिंगोली - १४,९८६ मते मिळाली. अनुसूचित जमातीच्या दोन्ही जागी आपला पाया असून आपल्याला बरी मते मिळाली असली तरी २००९च्या तुलनेने मतांच्या टक्केवारीत घट झाली आहे.

**आसाम**

पक्षाने तीन जागा लढवल्या. बारपेटामध्ये आपल्याला २७,५३९ (२.३ टक्के), तेजपूरमध्ये २४,९०५ (२.५ टक्के) आणि सिल्चरमध्ये १२,४२८ (१.६ टक्के) मते मिळाली. आपण मागच्या वेळीदेखील या जागा लढवल्या होत्या. आपल्या मतांत घट झाली आहे.

**ओडिशा**

पक्षाने १ लोकसभेची आणि १२ विधानसभेच्या जागा लढवल्या. ब्रह्मपूर लोकसभा मतदार संघात आपल्या उमेदवारास ३५,९६८ (४ टक्के) मते मिळाली आणि विधानसभेची बोनाई (अज) ही जागा ३९,१२५ मते मिळवून जिंकली. पक्षाला एकूण ०.४४ टक्के मते मिळाली.

**बिहार**

पक्षाने चार जागा लढवल्या. उजियारपूरमध्ये ५३,०४४ (६.२ टक्के) मते मिळाली, ती मागील वेळच्या मतांहून कमी आहेत. इतर जागांत मिळालेली मते - खगारिया २४,४९० (२.७ टक्के), पश्चिम चंपारण १७,१५७ (२ टक्के) आणि दरभंगा ११,६०६ (१.४ टक्के)

**पंजाब**

पक्षाने ३ जागा लढवल्या पण कामगिरी वाईट आहे. तीन जागांत मिळून आपल्याला १७,८३३ (०.१३ टक्के) मते मिळाली. आनंदपूर साहिबमध्ये १०,४८३ मते मिळाली जी २००९ पेक्षा कमी आहेत.

## पक्षाच्या स्वतंत्र ताकदीत घट

२००९च्या निवडणुकीत आपली पीछेहाट झाली होती. त्याही मतांत आता घट झाली आहे. यावरून पक्षाच्या स्वतंत्र ताकदीत घट होऊन एकूणच राजकीय प्रभाव कमी झाला आहे. पक्षाची मर्यादित ताकद आणि कुठल्याही प्रादेशिक पक्षासोबत आघाडी न झाल्याने आपल्याला प. बंगाल, केरळ आणि त्रिपुराबाहेर इतर राज्यांत एकही जागा मिळण्याची अपेक्षा नव्हती. पण आपण लढवलेल्या जागी आपल्या मतांची टक्केवारी घसरली आहे, ही अस्वस्थ करणारी बाब आहे.

प. बंगाल, केरळ आणि त्रिपुरा सोडून इतर राज्यांतील निकालांचे विश्लेषण केल्यास हा निष्कर्ष निघतो. या राज्यांतील २००९च्या निकालांशी तुलना करता या वेळी आपली मतांची टक्केवारी कमी झाली आहे. याला केवळ झारखंडमधील राजमहल (अज) हा मतदारसंघ अपवाद आहे.

त्रिपुराचा अपवाद सोडता देशभरातील मतांच्या टक्केवारीत घट झालेली आहे. गेल्या ३० वर्षांतील पक्षाच्या निवडणुकीतील कामगिरीचे विश्लेषण केल्यास, तीन राज्ये सोडल्यास, पक्षाची स्वतंत्र ताकद वरचेवर घसरत चालल्याचे दिसून येते. पक्षाची प. बंगालमधील या वेळची पीछेहाट पहाता हे विशेषत्वाने दिसून येते.

## काही निरीक्षणे

मतांच्या प्राथमिक विश्लेषणाच्या आणि आजवर राज्य समित्यांनी घेतलेल्या आढाव्याच्या आधारावर काही निरीक्षणे नोंदवणे शक्य आहे.

सर्वसाधारणत: नवीन पिढीला आकर्षित करण्यात पक्षाला अपयश आले आहे. याचा अर्थ या गटात, विशेषत: १८ ते २५ या वयोगटात पक्षाविषयी आकर्षण नाममात्रही नाही. पक्षाचे काम तरुणांना उद्देशून कसे करावे, विद्यार्थी-युवकांच्या जनसंघटना कशा मजबूत कराव्यात, याचे काम तातडीने हाती घेतले पाहिजे.

पक्षाचा पाठिंबा कमी झालेला दुसरा विभाग म्हणजे मध्यमवर्ग. शहरांतून पक्षाला मिळालेल्या मतांवरून हे स्पष्टपणे दिसून येते. मध्यमवर्गात कसे काम करावे, हा महत्वाचा प्रश्न आहे.

आपल्या तीन मजबूत राज्यांबाहेर आदिवासी जागांत कामगिरी जराशी बरी दिसते. आदिवासी विभागात तुलनेने मतांची ताकद टिकून राहिल्याचे दिसते. तेलंगण आणि ओडिशात जिंकलेल्या विधानसभेच्या जागा आदिवासी राखीवच आहेत. आपण आदिवासी क्षेत्रातील आपल्या कामाकडे जास्त लक्ष दिले पाहिजे.

आजवर घेण्यात आलेल्या राज्यांच्या आढाव्यातून कामगारवर्ग, शेतकरी आणि शेतमजुरांत मतांचे स्वरूप कसे राहिले आहे, हे अजून पुढे आलेले नाही. सर्वसाधारणत: याही क्षेत्रात कामगिरी फारशी समाधानकारक नाही असे म्हणता येणे शक्य आहे. काही क्षेत्रात या वर्गातील आपला मूळ पाया कायम असला तरी काही ठिकाणी तो ढासळला आहे.

## निवडणूक सुधारणांची गरज

या निवडणुकीत पैशाचा महाप्रचंड वापर दिसून आला. टेलिव्हिजन, रेडिओ, वृत्तपत्रे यातील जाहिरातींवर भाजपने अतोनात पैसा खर्च केल्याचे दिसून आले. सध्याच्या निवडणूक नियमांनुसार खासगी विमाने आणि हेलिकॉप्टर यांचा विविध राजकीय पक्षांना वापर करायला परवानगी आहे. पण त्यासोबतच मतदारांना पैशाचे वाटप मोठ्या प्रमाणात करण्यात आले. तामिळनाडू, आंध्रप्रदेशात तर हे जास्तच प्रकर्षाने दिसून आले. कायदेशीर आणि बेकायदेशीर अशा दोन्ही रीतीने होणाऱ्या पैशाच्या वापरावर कडक निर्बंध घालायलाच

हवेत. शासनाने उमेदवारांचा खर्च करायची तरतूद असलेली निवडणूक सुधारणा व्हायलाच हवी. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची सुधारणा करण्यासाठी आपण मोहीम उघडायला हवी. या सुधारणा झाल्या नाहीत तर पैशाच्या जोरावर लोकशाहीची विटंबना होत राहील आणि जास्तीत जास्त राजकीय पक्ष व उमेदवार बड्या भांडवलदारांच्या आणि त्यांच्या वर्गहिताच्या कच्छपि लागतील.

## निष्कर्ष

पक्षाचा जनतेतील पाया निरुंद झाला आहे, हे वादातीत आहे. खेदजनक निकालावरून पक्षाला प्रगती करता आलेली नाही, हे स्वच्छ दिसते. राजकीय प्रभाव वाढवणे, संघटनात्मक ताकद वाढवणे, विशेषत: मुलभूत वर्गातील पाया वाढवणे याबाबतीतील अपयश फारच ढळढळीतपणे नजरेस येते. याची जबाबदारी प्रामुख्याने पॉलिटब्यूरो आणि केंद्रीय नेतृत्वावर येते.

१. पक्षाची स्वतंत्र ताकद वाढविण्यावर आपण सर्व पक्ष काँग्रेसमध्ये भर दिला आहे. काही राज्यांनी आपल्या अपयशास भांडवली पक्षांसोबत केलेल्या आघाड्या कारण असल्याचे म्हटले आहे. पक्षाची स्वतंत्र ताकद वाढवण्यात आलेल्या अपयशाला आपण आजवर घेत असलेले राजकीय डावपेचात्मक धोरण कारणीभूत आहे का याचा समीक्षात्मक आढावा घेतला पाहिजे.

२. आपण करीत असलेल्या जनआंदोलनांचे रूपांतर पक्षाच्या राजकीय प्रभावात करण्यात अपयश येत आहे. नवे संघर्ष आणि नवी आंदोलने छेडण्यातही आपल्याला अपयश येत आहे. त्यामुळे पक्षाची संघटना आणि लोकांत काम करायची पद्धत याकडे नव्याने पहाण्याची गरज निर्माण झाली आहे.

३. जनसंघटनांच्या सदस्यांनी मोठ्या प्रमाणावर पक्षाच्या वा डाव्या उमेदवारांना मतदान केलेले नाही, हे राज्य समित्यांच्या आढाव्यावरून दिसून आले आहे. जनसंघटनांच्या कामाचे स्वरूप, त्यांचे स्वतंत्र कार्य यांची नव्याने तपासणी केली पाहिजे. त्यात राजकीय कार्य आणि पक्ष बांधणीचे काम तातडीने सुरू केले पाहिजे.

४. नवउदार व्यवस्थेच्या पंचवीस वर्षात सामाजिक-आर्थिक परिस्थितीत मोठे बदल झाले आहेत. त्याच्या परिणामी वर्गातंर्गत भेद पडले आहेत. ते अजून पुरेश्या रीतीने समजून घेता आलेले नाहीत. त्यांचा अभ्यास करून विश्लेषण करायला हवे. त्या आधारावरच आपल्याला आपल्या घोषणा विकसित करून पक्ष आणि जनसंघटनांच्या कार्यपद्धतीत बदल करता येतील. आज आपल्या काही मागण्या आणि घोषणा या वास्तवाला धरून नाहीत, त्या जनतेच्या विविध विभागांच्या आकांक्षा व्यक्त करत नाहीत. पक्षाच्या पुढील कार्याच्या दृष्टीने याला कळीचे महत्व आहे.

परिस्थितीचे गांभीर्य ध्यानात घेऊन केंद्रीय समितीने वरील चार उपाय अंमलात आणणे अत्यावश्यक असून योग्य त्या सुधारणा करायला हव्यात.

## नवी परिस्थिती

नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप-आघाडी सरकारच्या कामाची दिशा स्पष्ट होऊ लागली आहे. नवउदार धोरण आणि बड्या उद्योगांच्या फायद्याची धोरणे ते आक्रमकपणे राबवू लागणार आहे. आधीच्या रालोआ सरकारप्रमाणेच शासनाच्या विविध अंगात रा.स्व.संघ शिरकाव करायला, शिक्षणव्यवस्था आणि सामाजिक, सांस्कृतिक संस्थांत धर्मांध विचारसरणी घुसवायला सुरुवात करील. 'राष्ट्रीय सुरक्षा' या नावाखाली लोकांचे लोकशाही हक्क पायदळी तुडवायला सुरुवात होईल. मोदींचे विकास मॉडेल कल्याणकारी योजना आणि गरीब जनतेचे जीवनमान आक्रसून टाकणारे असेल.

माकप आणि डाव्यांना नवउदार धोरणाचे नवे हल्ले परतवून लावण्यासाठी कंबर कसावी लागेल. श्रमिकांची विविध आंदोलने उभारायचे काम करावे लागेल. धर्मांध शक्तींविरुध्द लढण्यासाठी आपल्याला अग्रभागी रहावे लागेल. समाजात धर्मांध विचारसरणीविरुध्द सर्व लोकशाही आणि धर्मनिरपेक्ष शक्तींना संघटित करावे लागेल.

भाजपने केवळ हिंदुत्ववादी कार्यक्रम आणि जमातवादी भावना उद्दीपित करून निवडणूक जिंकलेली नाही. विकास, रोजगार आणि प्रशासनात बदल याबाबत दिलेल्या आश्वासनांची पूर्ती त्याने करावी म्हणून जनतेने त्यांना मते दिली आहेत. त्यामुळे त्या पक्षाचा हिंदुत्ववादी कार्यक्रम आणि जनतेच्या आकांक्षा यात अंतर्विरोध निर्माण होईल. लोकांचे हितसंबंध जोपासण्यासाठी श्रमिक जनतेचे लढे पक्षाला उभे करावेच लागतील. धर्मनिरपेक्षता, अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण आणि सामाजिक न्यायाचा लढा पुढे नेण्यासाठी पक्ष कटिबद्ध आहे. पक्षाच्या राजकीय आणि संघटनात्मक कमजोऱ्यांवर मात करून पक्ष येत्या काळात डाव्या आणि लोकशाहीवादी शक्तींची आगेकूच करण्यासाठी नव्या जोमाने कामाला लागेल.

## तातडीची कार्ये

१. पक्ष जनतेपासून अलग पडला आहे हे ध्यानात घेऊन आपण लोकांत जायला हवे, आपले त्यांच्यातील काम वाढवायला हवे, लोकांशी अभेद्य दुवे जोडायला हवेत आणि स्थानिक प्रश्नांवर संघर्ष करायला हवेत.

२. मोहिमांत पुढे आलेल्या नव्या कार्यकर्त्यांना आणि समर्थकांना जनसंघटनांत खेचायला हवे. जास्त पुढारलेले कार्यकर्ते पक्षात सहभागी करून घेण्यासाठी पक्ष समित्यांनी पावले उचलायला हवीत.

३. भाजपचे नवे सरकार नवउदार आर्थिक धोरणे स्वीकारीत राहील. त्यांचे लोकांवर होणारे परिणाम ध्यानात घेऊन मोहिमा आणि आंदोलने उभारायला हवीत.

४. प. बंगालमध्ये माकप व डाव्या पक्षांवर होत असलेल्या हल्ल्यांच्या विरोधात तेथील पक्षाशी बंधुभाव व्यक्त करणाऱ्या मोहिमा घ्यायला हव्यात.

५. धर्मांध कार्यक्रम रेटायच्या कोणत्याही प्रयत्नाच्या विरोधात पक्षाने तातडीने पुढाकार घ्यायला हवा. धर्मनिरपेक्ष आणि लोकशाहीवादी शक्तींना जास्तीत जास्त संघटित करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

६. डावी एकजूट भक्कम करण्यासाठी आणि डाव्यांच्या नेतृत्वाखालील संघटनांचे लढे आणि मोहिमांसाठी सुसूत्रीकरण करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. डावे विचारवंत आणि पुरोगामी व्यक्तींशी दुवे प्रस्थापित करायला हवेत.

७. पक्ष संघटनेची पुनर्रचना आणि सुधारणा करण्यासाठी त्वरित पावले उचलायला हवीत.

८. राज्य समित्यांनी निवडणूक निकालांच्या पार्श्वभूमीवर जनसंघटनांच्या कामाची तपासणी करायला हवी. त्यांची स्वतंत्र कार्यपद्धती आणि लोकांचे प्रश्न घेण्यातील आंदोलनातील पुढाकार जोपासायला हवा.

९. मोहिमांची ठोकळेबाज पद्धत बदललीच पाहिजे. लोकांना आवाहन करण्यासाठी संवादाच्या नव्या पद्धती वापरल्या पाहिजेत. निवडणूक काळात स्थापन केलेल्या मीडिया टीम्सना स्थायी स्वरूप देऊन त्यांच्या कामात सुसूत्रता आणली पाहिजे.

१०. केंद्रीय समितीने घेतलेला निवडणूक आढावा आणि तातडीची कार्ये यांचे रिपोर्टिंग पक्षात व्यापक स्तरावर झाले पाहिजे. यासाठी समित्यांच्या बैठकांसोबतच पक्षाच्या जनरल बॉडी सभाही झाल्या पाहिजेत.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीचा आढावा

***मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कमिटीच्या बेलापूर येथे २८-२९ जून २०१४ ला झालेल्या बैठकीने स्वीकारलेला***

## (अ) एकूण चित्र

**१.१** २०१४च्या लोकसभा निवडणुकीत, देशभरात दिसलेल्या चित्राची जास्तच मजबुतीने पुनरावृत्ती महाराष्ट्रात झाली. भाजप-शिवसेना महायुतीने ४८ पैकी ४२ जागा जिंकून अभूतपूर्व विजय संपादन केला. भाजपला २३, शिवसेनेला १८ आणि स्वाभिमानी पक्षाला १ जागा मिळाली. राष्ट्रीय समाज पक्ष आणि रिपब्लिकन पक्ष (आठवले) हेही महायुतीत सामील होते.

**१.२** काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीने फक्त ६ जागा जिंकून आजवरचा नीचांक गाठला. काँग्रेसला अवघ्या २ तर राष्ट्रवादीला केवळ ४ जागा जिंकता आल्या. केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, प्रफुल पटेल आणि मिलिंद देवरा, तसेच राज्यातील मंत्री छगन भुजबळ, शिवाजीराव मोघे आणि संजय देवतळे यांचा दारुण पराभव झाला.

**१.३** विभागवार चित्र पाहिले तर विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई-ठाण्यासह कोकण या सर्व विभागांत युतीला सर्वच्या सर्व जागा मिळाल्या आणि आघाडीचा पूर्ण सफाया झाला. मराठवाड्यात फक्त दोन जागा काँग्रेसला जिंकता आल्या, त्यातील हिंगोलीची जागा निसटत्या बहुमताने. पश्चिम महाराष्ट्रात फक्त चार जागा राष्ट्रवादीला जिंकता आल्या, पण येथेही बारामती, माढा व कोल्हापूर येथील मताधिक्य अल्प होते.

**१.४** महाराष्ट्रातील चार प्रमुख प्रस्थापित पक्षांना गेल्या तीन लोकसभा निवडणुकांत मिळालेल्या जागा आणि मतांची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे.

| पक्ष | २००४ | | २००९ | | २०१४ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जागा | मते% | जागा | मते% | जागा | मते% |
| भाजप | १३ | २२.६ | ९ | १८.२ | २३ | २७.३ |
| शिवसेना | १२ | २०.१ | ११ | १७.० | १८ | २०.६ |
| युती | २५ | ४२.७ | २० | ३५.२ | ४१ | ४७.९ |
| काँग्रेस | १३ | २३.८ | १७ | १९.६ | २ | १८.१ |
| राष्ट्रवादी | ९ | १८.३ | ८ | १९.३ | ४ | १६.० |
| आघाडी | २२ | ४२.१ | २५ | ३८.९ | ६ | ३४.१ |

**१.५** वरील तक्त्यावरून दिसेल की गेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत, या वेळेस युतीची मते सुमारे १३ टक्क्यांनी ४७.९ टक्क्यांपर्यंत वाढली. त्यात महायुतीचे इतर तीन भागीदार स्वाभिमानी पक्ष (२.३ टक्के), राष्ट्रीय समाज पक्ष (०.९ टक्का) आणि रिपब्लिकन पक्ष-आठवले (०.१ टक्का) मिळविले, तर महायुतीची मतांची टक्केवारी ५१.२ पर्यंत जाते. गेल्या अनेक दशकांत महाराष्ट्रात कोणत्याही निवडणुकीत ५० टक्के मतांचा आकडा कोणत्याही पक्षाने वा आघाडीने पार केला नसावा. याउलट काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे मतदान सुमारे ५ टक्क्याने कमी होऊन ते ३४.१ टक्क्यांवर येऊन पोहोचले.

**१.६** दोन मुख्य आघाड्यांमध्ये या निवडणुकीत मतांचे ध्रुवीकरण झाल्यामुळे सर्व लहान पक्षांना फटका बसला. गेल्या लोकसभा निवडणुकीत ४.१ टक्के मते मिळविणाऱ्या मनसेची मोठी पीछेहाट झाली आणि तिला यंदा फक्त १.५ टक्के मते घेता आली. मनसेमुळे काँग्रेस-आघाडीलाच फायदा होतो ह्या गेल्या दोन निवडणुकीत लोकांना आलेल्या अनुभवामुळे या वेळेस मनसेची मते घसरली. त्याचबरोबर निवडणुकीपूर्वी मनसेच्या उलटसुलट भूमिकाही त्या पक्षाला भोवल्या. बहुजन समाज पक्षाची मतेही गेल्या वेळच्या ४.८ टक्क्यांवरून यंदा २.६ टक्क्यांपर्यंत घसरली. भारिप-बहुजन महासंघाला ०.७ टक्के मते मिळाली आणि अकोला मतदारसंघात तो तिसऱ्या क्रमांकावर राहिला. समाजवादी पक्षाला फक्त ०.२ टक्के मते मिळाली.

**१.७** आम आदमी पक्षाबद्दल या निवडणुकीत विशेषत: तरुण पिढीत आणि मध्यमवर्गात बरेचसे आकर्षण निर्माण झाले होते. दिल्ली विधानसभेत 'आप'चा विजय आणि त्यापूर्वी त्याने सातत्याने चालविलेले भ्रष्टाचारविरोधी आंदोलन ही त्याची दोन मुख्य कारणे होती. पण त्याचबरोबर आम्ही डावे नाही, आम्ही भांडवलशाहीच्या विरोधात नाही, आम्ही फक्त वशिलेबाज भांडवलशाहीच्या (क्रोनी कॅपिटॅलिझम) विरोधात आहोत असे त्यांचे नेते निवडणुकीपूर्वी वारंवार सांगत होते. महाराष्ट्रात मुख्यत: पूर्वाश्रमीच्या समाजवादी परिवारातील काही कार्यकर्ते 'आप'मध्ये गेले. देशात 'आप'ने लोकसभेच्या ४३२ जागा लढवून २ टक्के मते मिळवली. तर महाराष्ट्रात सर्व ४८ जागा लढवून त्याला २.२ टक्के मते मिळाली. फक्त चंद्रपूरमध्ये पूर्वी शेतकरी संघटनेत असलेल्या त्यांच्या उमेदवारांना २ लाखाहून अधिक मते मिळाली. पाच-सात जागांवर त्यांच्या उमेदवारांना प्रत्येकी ३० ते ७५ हजार मते पडली आणि इतर सर्व जागांवर ते नगण्य ठरले. पुणे, सोलापूर, औरंगाबाद, बीड, शिर्डी व इतर काही जागांवर 'आप'च्या उमेदवारांना पक्षाने सक्रिय पाठिंबा दिला. मेधा पाटकरांनी बंगालमध्ये घेतलेल्या माकपविरोधी आणि तृणमूलधार्जिण्या भूमिकेमुळे त्यांना पाठिंबा न देण्याचा निर्णय पक्षाने घेतला.

**१.८** महाराष्ट्रात डावी आघाडी म्हणून माकप, भाकप, शेकाप व जद (से) या चार पक्षांनी निवडणुका एकत्रित लढविण्याचा निर्णय प्रारंभी घेतला. पण मध्येच शेकापच्या नेतृत्वाने रायगड जिल्ह्यातील शिवसेना-भाजपशी असलेला आपला समझोता तुटल्याचे जाहीर करून मनसेशी समझोता केला. मनसेचे जे खासदार निवडून येतील ते पंतप्रधानपदासाठी नरेंद्र मोदींना पाठिंबा देतील असे जाहीर वक्तव्य राज ठाकरेंनी मार्च महिन्याच्या सुरुवातीस केल्यानंतरही शेकापने मनसेबरोबरचा समझोता कायम ठेवला. नाशिकच्या जागेत मनसे आणि माकप असे दोन उमेदवार असताना शेकापने मनसेचे काम केले. डाव्या लोकशाही आघाडीतील उर्वरित तिन्ही पक्षांनी शेकापच्या या एकूण राजकीय भूमिकेबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. शिवाय मावळ आणि रायगड या दोन मतदारसंघांत शेकापने उभे केलेले उमेदवार त्यांचे स्वत:चे नव्हते, ते राष्ट्रवादी काँग्रेसशी पूर्वी संबंधित होते. फक्त कोल्हापुरातील त्यांचा उमेदवार मूळचा शेकापचा माजी आमदार होता. पण कोल्हापुरात शेकापचा एक विभाग आणि भाकप यांनी शेकापचे काम न करता लाल निशाण (लेनिनवादी)च्या उमेदवाराचे काम केले. भाकपने कोल्हापूर जिल्ह्याच्या हातकणंगले लोकसभा मतदारसंघात काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा देणारे जाहीर पत्रक प्रसिध्द केले. शेकापला राज्यात एकूण १ टक्का मते मिळाली.

**१.९** माकपने या निवडणुकीत चार जागा लढवून एकूण ०.४ टक्के मते मिळविली. पक्षाला एकूण १,८१,६२९ मते मिळाली. भाकपने चार

जागा लढविल्या, त्यावर त्यांना एकूण ५५,५३९ मते मिळाली. त्यात फक्त गडचिरोलीत त्यांना २२,०००हून अधिक मते आहेत. जद (से)ने लढविलेल्या तीन जागांवर त्याला एकूण फक्त ५,४२३ मते मिळाली. जद (से)चे अस्तित्व राज्यात अतिशय नाजूक होत असल्याचे ते चिन्ह आहे. अर्थात सर्वच डाव्या आणि धर्मनिरपेक्ष पक्षांची महाराष्ट्रातील आणि देशातील परिस्थिती अतिशय चिंताजनक झाली आहे हे खरेच आहे. त्याची सखोल चर्चा राज्य कमिटीत झाली पाहिजे आणि त्यावर योग्य ते उपाय केले पाहिजेत.

## (ब) निवडणूक निकालांचे विश्लेषण

२.१ महाराष्ट्रातील निवडणूक चित्रात इतके मोठे बदल घडण्यास कोणते मुख्य घटक कारणीभूत ठरले? याचा गांभीर्याने विचार आपण केला पाहिजे. त्यातील काही घटक राष्ट्रीय पातळीवरचे आहेत तर काही राज्य पातळीवरचे आहेत.

२.२ महागाई, बेरोजगारी, शेती अरिष्ट आणि भ्रष्टाचार यांचे प्रतीक बनलेल्या केंद्रातील काँग्रेस-प्रणित संपुआ सरकारविरुद्ध जनतेचा प्रचंड रोष जसा देशभर व्यक्त झाला, तसाच तो महाराष्ट्रातही व्यक्त झाला.

२.३ केंद्रात काँग्रेस-प्रणित सरकार गेली १० वर्षे सत्तेत होते, तर महाराष्ट्रात ते गेली १५ वर्षे सत्तेत आहे. हे सरकारही असेच जनविरोधी, अकार्यक्षम आणि भ्रष्टाचारी ठरल्यामुळे लोकांचा या सरकारवरही मोठा रोष होता आणि तोही मतदानात व्यक्त झाला.

२.४ नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप-रा.स्व. संघाच्या निवडणूक मोहिमेला बड्या उद्योगपती घराण्यांनी जो वारेमाप पैसा दिला आणि त्यांच्याच मालकीच्या प्रसारमाध्यमांनी जी अभूतपूर्व प्रसिद्धी दिली, ते त्यांच्या यशामागील एक कळीचे कारण होते.

२.५ भाजपने या निवडणुकीत दुहेरी प्रचार नीती वापरली. एकीकडे नरेंद्र मोदी जलद विकास, सुप्रशासन आणि तथाकथित 'गुजरात मॉडेल'चे गाजर दाखवून काँग्रेसपासून मुक्तीचे स्वप्न रंगवित होते तर दुसरीकडे अमित शहा, रामदेव बाबा, गिरिराज सिंह व संघ परिवाराचे इतर नेते धर्मांध प्रचार करत फिरत होते. मुझफ्फरनगरची दंगल आणि इतर अनेक ठिकाणच्या धर्मांध घटनांची पार्श्वभूमी होतीच. महाराष्ट्रात धुळे व इतरत्र अलीकडे जातीय दंगली व तत्सम घटना घडल्या होत्या.

२.६ काँग्रेस-राष्ट्रवादीबद्दलचा भ्रमनिरास इतक्या मोठ्या प्रमाणावर होता की, त्यांचा पारंपरिक जनाधार असलेल्या मुस्लिम आणि दलित जनतेतही प्रचंड उदासीनता होती. अनेक ठिकाणी ही उदासीनता मतदानास न जाण्यात दिसून आली.

२.७ राज्यातील जवळपास सर्वच वर्ग आणि समाज-विभागांतून युतीला या खेपेस वाढीव मतदान मिळाले. त्यात कामगार, शेतकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी, ओबीसी, पुढारलेल्या जाती, महिला आणि विशेषत: तरुण व मध्यमवर्गाचा मोठा हिस्सा होता.

२.८ भाजप-सेनेने स्वाभिमानी पक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष आणि रिपब्लिकन पक्ष (आठवले) यांच्या सोबत जी महायुती केली ती युतीच्या पथ्यावर पडली. स्वाभिमानी पक्षाने हातकणंगलेची जागा जिंकण्याबरोबरच माढा मतदारसंघातही जबरदस्त टक्कर दिली आणि राष्ट्रीय समाज पक्षाने बारामतीतही जोरदार लढत दिली. रिपब्लिकन पक्ष (आठवले)ला सातारा मतदारसंघात फारशी मते मिळाली नसली, तरी तो महायुतीत असल्यामुळे दलित जनतेतील एका विभागाचा महायुतीला राज्यभर पाठिंबा मिळाला.

२.९ काँग्रेस आणि राष्ट्रवादीमध्ये अनेक मतदारसंघांत तीव्र वितुष्ट होते. सिंधुदुर्गमध्ये तर ते पार टोकालाच गेले, पण इतरही अनेक मतदारसंघांत एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रकार झाले. त्यामुळे आघाडीमध्ये बेबनाव असल्याचे चित्र अनेक ठिकाणी व अनेक वेळा मतदारांसमोर गेले. निवडणूक काळात शरद पवारांनी नरेंद्र मोदींबाबत जी उलट सुलट विधाने केली, त्यामुळेही लोकांत संभ्रम निर्माण झाला आणि आघाडीची मते घटली.

२.१० अखेरची बाब म्हणजे यंदा देशात जे झाले ते राज्यातही झाले. डाव्या, लोकशाहीवादी व धर्मनिरपेक्ष पक्षांचा तिसरा पर्याय औषधालासुद्धा नव्हता. त्यामुळे जनतेसमोर काँग्रेस-आघाडीला एकमेव पर्याय भाजप-युतीचाच राहिला आणि त्यानुसार मतदान झाले.

## (क) आपल्या पक्षाची कामगिरी

३.१ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने या निवडणुकीत प्रथमच चार जागा लढवल्या. पालघर (अज) आणि दिंडोरी (अज) या ठाणे व नाशिक जिल्ह्यातील आपल्या दोन पारंपरिक जनाधाराच्या जागा होत्या. नाशिक आणि हिंगोली या दोन सर्वसाधारण जागा आपण या खेपेस प्रथमच लढवल्या. हिंगोली जागेत हिंगोली, नांदेड आणि यवतमाळ या तीन जिल्ह्यांचे वेगवेगळे तालुके होते.

३.२ पालघर आणि दिंडोरी या दोन्ही जागांवर पक्ष तिसऱ्या क्रमांकावर राहिला. हिंगोलीत पक्ष चौथ्या क्रमांकावर आणि नाशिकमध्ये तो पाचव्या क्रमांकावर राहिला. या चार जागांत माकप व इतर प्रमुख पक्षांना मिळालेले मतदान या पानावर शेवटी दिले आहे.

३.३ मागील लोकसभा निवडणुकीशी तुलना करता, पालघर जागेवर आपल्याला सुमारे १५,००० मते कमी मिळाली, गेल्या खेपेस आपणांस तेथे ९२,२२४ मते मिळाली होती. दिंडोरी जागेवर गेल्या निवडणुकीच्या तुलनेत आपली मते सुमारे ३३,००० ने कमी झाली. तेथे गेल्या खेपेस आपणांस १,०५,३५२ मते मिळाली होती.

३.४ नाशिक लोकसभा मतदारसंघात आपल्या किमान ५० हजार मतांच्या अपेक्षेपेक्षा आपल्याला खूप कमी मते मिळाली. हिंगोली मतदारसंघ लढविण्याचा निर्णय अखेरच्या क्षणी झाला. तो आधी झाला असता तर तेथील मते काही प्रमाणात वाढली असती.

३.५ या अहवालाअखेर चारही मतदारसंघात मिळालेली विधानसभा क्षेत्रनिहाय मते दिलेली आहेत. गेल्या वेळेस डहाणू आणि कळवण विधानसभा

| क्र. | जागा | माकप | भाजप-महायुती | काँग्रेस-आघाडी | आप | बसपा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पालघर (अज) | ७६८९० | ५३३२०१ | २९३६८१ | १६१८२ | ८१७६ |
| | | | | (बहुजन विकास आघाडी) | | |
| २. | दिंडोरी (अज) | ७२५९९ | ५४२७८४ | २९५१६५ | ४०६७ | १७७२४ |
| ३. | नाशिक | १७१५४ | ४९४७३५ | ३०७३९९ | ९६७२ | २०८९६ |
| ४. | हिंगोली | १४९८६ | ४६५७६५ | ४६७३९७ | ३७२९ | २५१४५ |

क्षेत्रांत पक्षाला आघाडी होती. या वेळेस डहाणूत आपण भाजपनंतर दुसऱ्या क्रमांकावर आणि कळवणमध्ये राष्ट्रवादी आणि भाजपनंतर तिसऱ्या क्रमांकावर आहोत. या वेळेस पालघर मतदारसंघात काँग्रेस-राष्ट्रवादीच्या उमेदवाराने ऐनवेळी माघार घेतली आणि या दोन्ही पक्षांनी बहुजन विकास आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. पण त्यांची बहुसंख्या मते बविआला न पडता भाजपलाच पडली. पालघर मतदारसंघात विक्रमगड आणि दिंडोरी मतदारसंघात दिंडोरी या दोन क्षेत्रांत आपण आपले मतदान काही प्रमाणात टिकविले आहे. पण गेल्या विधानसभा निवडणुकीत आपण लढविलेल्या जागांच्या तुलनेत नाशिक(पश्चिम), इगतपुरी व किनवट या जागांवर आपले मतदान बरेच घसरले आहे. इतर सर्वच विधानसभा क्षेत्रात आपण फारच मागे आहोत.

३.६ ३१ मे २०१४ पर्यंत या चारही मतदारसंघांतील आपल्या कामगिरीचा जिल्हा कमिट्यांनी आढावा घेऊन त्याचा लेखी अहवाल राज्य कमिटीला पाठवावा असे सर्वांना राज्य कमिटी परिपत्रकात दोनदा कळविले होते. त्या जिल्हा आढाव्यांच्या आधारावर या राज्य आढाव्यात काही ठोस निष्कर्ष काढता आले असते. पण एकाही जिल्हा कमिटीचा लेखी अहवाल राज्य केंद्राकडे आजपर्यंत आलेला नाही. ही पद्धत योग्य नाही हे येथे अधोरेखित केले पाहिजे.

३.७ चारही मतदारसंघातील निवडणूक मोहीम प्रभावीरीत्या राबविली गेली. पक्ष व जनसंघटनांच्या हजारो कार्यकर्त्यांनी मोहिमेत उत्साही भाग घेतला. पालघर, दिंडोरी व नाशिक या तीन जागांमध्ये प्रत्येकी ४ लाखाहून अधिक पत्रकांचे वाटप झाले आणि हिंगोलीमध्ये सुमारे ५० हजार पत्रकांचे वाटप झाले. घरोघर प्रचार, जीपचा माईक प्रचार आणि जाहीर सभा याद्वारे प्रचार मोहीम राबविली गेली.

३.८ महाराष्ट्रातील निवडणूक प्रचारात पक्षाचे पॉलिटब्यूरो सदस्य सीताराम येचुरी, वृंदा करात व एम. ए. बेबी, केंद्रीय सचिवमंडळ सदस्य निलोत्पल बसू, त्रिपुराचे मंत्री आणि खासदारकीचे उमेदवार जितेंद्र चौधरी, केंद्रीय कमिटी सदस्य डॉ. अशोक ढवळे व नरसय्या आडम, राज्य कमिटी सदस्य एम. एच. शेख यांनी भाग घेऊन अनेक मतदारसंघात जाहीर सभा घेतल्या. राज्य सचिवमंडळ सदस्य महेंद्र सिंह, डॉ. किशोर ठेकेदत्त, जे. पी. गावीत, डॉ. डी. एल. कराड, आ. राजाराम ओझरे, मरियम ढवळे, उदयन शर्मा, विजय गाभणे आणि नथ्थू साळवे यांनी आपापल्या मतदारसंघात पूर्णवेळ कार्य केले. त्या जिल्ह्यांतील सर्व राज्य कमिटी व बहुतेक जिल्हा कमिटी सदस्यांनीही चांगले कार्य केले. चारही मतदारसंघातील आपले उमेदवार लाडक्या खरपडे, हेमंत वाघेरे, तानाजी जायभावे व डी. बी. नाईक हे प्रभावी होते आणि त्यांनी निवडणूक प्रचार मोहिमेत उत्तम पुढाकार घेतला.

३.९ मुंबईत सोशल मीडीयाची एक दिवसाची कार्यशाळा मार्च महिन्यात घेण्यात आली. राज्यातून पाच-सहा कॉम्रेड दिल्लीत झालेल्या अशाच कार्यशाळेसाठी जाऊन आले. शुभा शमीम यांना पक्षाच्या सोशल मीडीया सेलचे निमंत्रक म्हणून नेमण्यात आले. या टीमने चांगले काम केले आणि केंद्राला तसेच पक्षाच्या केंद्रीय मुखपत्रांना महाराष्ट्रातील निवडणूक मोहिमेविषयीची माहिती पाठविली. पण सर्व जिल्ह्यांतून जो प्रतिसाद यायला हवा होता तो मात्र समाधानकारकरीत्या आला नाही. निदान विधानसभा निवडणुकीत त्यात सुधारणा झालीच पाहिजे.

३.१० ऑक्टोबर २०१४ मध्ये होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची तयारी करणे हे आज आपल्यासमोरील सर्वात कळीचे कार्य आहे. सर्व डाव्या आणि धर्मनिरपेक्ष शक्तींसाठी ते एक मोठे आव्हान असणार आहे. परवाच्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला २८८ पैकी २३४ विधानसभा क्षेत्रात आघाडी आहे. लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात अनेक महत्वाच्या राजकीय घडामोडी झाल्या आहेत, त्याचा वेगळा आढावा आपण या बैठकीत घेणार आहोत. पण विधानसभा निवडणुकीतील विजयासाठी आणि चांगल्या कामगिरीसाठी पक्षाची सारी ताकद एकजुटीने पणाला लावणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.

□□□

# लोकसभा निवडणुकीत माकप उमेदवारांना मिळालेली विधानसभा क्षेत्रनिहाय मते

## १. पालघर (अज): कॉ. खरपडे लाडक्या रुपा - एकूण मते ७६,८९०

| डहाणू (अज) | विक्रमगड (अज) | पालघर (अज) | बोईसर (अज) | नालासोपारा | वसई | पोस्टल |
|---|---|---|---|---|---|---|
| ४५,९९५ | १५,६१० | ७,१३१ | ५,६३८ | १,४०० | १,११४ | २ |

## २. दिंडोरी (अज): कॉ. वाघेरे हेमंत मोतीराम - एकूण मते ७२,५९९

| कळवण (अज) | दिंडोरी (अज) | चांदवड | नांदगाव | निफाड | येवला | पोस्टल |
|---|---|---|---|---|---|---|
| ४५,७७७ | १८,२७८ | ४,७४२ | १,४६६ | १,१७५ | १,१४५ | १६ |

## ३. नाशिक : कॉ. जायभावे तानाजी सुकदेव - एकूण मते १७,१५४

| इगतपुरी (अज) | नाशिक पश्चिम | देवळाली (अजा) | सिन्नर | नाशिक पूर्व | नाशिक मध्य | पोस्टल |
|---|---|---|---|---|---|---|
| ६,६४५ | ४,१०६ | २,१८९ | २,१२८ | १,१७४ | ८९४ | १८ |

## ४. हिंगोली: कॉ. डी. बी. नाईक - एकूण मते १४,९८६

| उमरखेड (अजा) | किनवट | कळमनुरी | हिंगोली | बसमत | हदगाव | पोस्टल |
|---|---|---|---|---|---|---|
| ४,५३५ | ४,२८१ | १,७८२ | १,६६९ | १,५४३ | १,१७३ | ० |

# तृणमूल काँग्रेसच्या खासदाराच्या भाषणाचा धिक्कार!

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांवर हिंसक हल्ले करा आणि महिलांवर बलात्कार करा असे तृणमूल काँग्रेसचा खासदार तापस पाल याने केलेले वक्तव्य अत्यंत धक्कादायक व निषेधार्ह आहे, असे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोचे मत आहे. त्याने माकपच्या कार्यकर्त्यांचे खून करण्याची, त्यांची घरे उद्ध्वस्त करण्याची आणि महिलांवर बलात्कार करण्यासाठी मुले धाडण्याची धमकी दिली आहे.

या घृणास्पद भाषणावरून प. बंगालमधील प्रत्यक्ष परिस्थिती कशी आहे याची कल्पना येते. तेथे तृणमूल काँग्रेसकडून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या आणि विरोधकांच्या विरोधात पध्दतशीरपणे हिंसाचार भडकवला जात आहे आणि दहशत पसरविली जात आहे. त्यामुळे त्यांच्या जगण्यालाच धोका निर्माण झाला आहे. या सर्व लोकशाहीविरोधी कृत्यांकडे राज्याचे प्रशासन पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे.

तापस पालच्या विरोधात कडक कारवाई झाली पाहिजे आणि त्याच्या विरोधात हिंसाचारास चिथावणी देणे आणि दहशत माजविणे या संदर्भात गुन्हेगारी खटले दाखल केले गेले पाहिजेत. संसदेनेही या गुन्हेगार खासदारावर कठोर कारवाई केली पाहिजे. *(१ जुलै २०१४)*

# तृणमूल काँग्रेसचा खासदार तापस पालवर कडक कायदेशीर कारवाई करा! पालचे लोकसभा सभासदत्व बरखास्त करा!

आपल्या राजकीय विरोधकांचे खून करा, त्यांच्यावर शारिरीक हल्ले करा, महिलांवर बलात्कार करा अशा अत्यंत चिथावणीखोर आणि धक्कादायक धमक्या देणाऱ्या प.बंगालमधील तृणमूल काँग्रेसचा खासदार तापस पाल याचा अतिशय तीव्र शब्दांत आम्ही निषेध करीत आहोत.

तापस पाल हा नाडिया जिल्ह्यातील कृष्णानगर येथून दुसऱ्यांदा निवडून आला आहे. ३० जून २०१४ रोजी प. बंगालमधील नाडिया जिल्ह्यातील नाकासीपारा, चौमाहा येथे तृणमूल पक्ष कार्यकर्ते आणि इतरांची एक सार्वजनिक सभा होती. त्या सभेत भाषण करताना त्याने आपल्या राजकीय विरोधकांना विशेषत: मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांना अत्यंत हीन शब्दांत धमकावले. अनेक प्रादेशिक आणि राष्ट्रीय चॅनेल्स त्याच्या या घृणास्पद भाषणाचे व्हिडिओ दाखवत आहेत.

''जर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या एखाद्या कार्यकर्त्याने माझ्या आईला, बहिणीला, काकाला, आत्याला हात लावला तर मी तापस पाल माझे रिव्हॉल्व्हर काढेन आणि त्यांच्यावर गोळ्या झाडेन... जे चौमाहामध्ये आमच्या विरोधात जातील त्यांना मी इशारा देतो की मी त्यांची घरे उद्ध्वस्त करेन आणि माझ्या पोरांना पाठवून त्यांच्या महिलांवर बलात्कार करायला लावेन... त्यांचे खानदान, घरे-दारे सारे मी नष्ट करेन.'' हे सर्व खुले आम चालू होते, समोर जमाव हे भाषण ऐकत होता आणि त्याच्या घृणास्पद वाक्यांना वेळोवेळी दाद देत होता. म्हणजेच तो जाणीवपूर्वक आपल्या पाठीराख्यांना आपल्या राजकीय विरोधकांविरोधात भडकावित होता. कायदा आणि सुव्यवस्था मोडीत काढण्याचाच हा प्रकार होता. नाडिया जिल्ह्यात निवडणुकीनंतरचा हिंसाचार अजूनही चालूच आहे. आतापर्यंत दोघा राजकीय विरोधकांचे खून झालेले आहेत. असंख्य हल्ल्यांच्या घटना घडलेल्या आहेत. अशा परिस्थितीत असे चिथावणीखोर भाषण लोकसभेच्या एखाद्या खासदाराने करणे फारच धोकादायक आहे. त्यामुळे त्या भागात दहशत आणि हिंसाचार प्रचंड प्रमाणात माजू शकतो.

तापस पाल हा तृणमूलचे नेते अनुब्राता मंडल आणि मनीरुल इस्लाम यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालत आहे. त्यांनीही खुनासारख्या हिंसाचाराचे समर्थन करण्यासाठी अशाच पध्दतीची भाषणे केलेली आहेत. राज्य सरकारने याविरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही. राज्याच्या प्रशासकीय प्रमुखांनी याकडे दुर्लक्ष केले आहे. एखादा निवडून आलेला लोकप्रतिनिधी अशा प्रकारे खुले आम बलात्कार, खून आणि शारिरीक हल्ले चढविण्यास चिथावणी देतो, तरीही पक्षाने केवळ आपला चेहरा लपविण्यासाठी त्याला कारणे दाखवा नोटीस पाठविली आहे. त्याचा तृणमूल काँग्रेस पक्ष अथवा राज्य सरकार त्याला शिक्षा व्हावी म्हणून काही करेल याबद्दल फारशी आशा बाळगण्यास जागा नाही.

पण निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या अशा वागणुकीमुळे काळीमा फासल्या गेलेल्या संसदीय लोकशाहीच्याच रक्षणासाठी आम्ही अशी मागणी करतो की, दाखवल्या गेलेल्या व्हिडिओच्या चित्रीकरणाचे परीक्षण करून तापस पाल याचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्याबरोबरच त्याच्यावर अतिशय कडक कायदेशीर कारवाई करावी.

जर तापस पालच्या विरोधात योग्य कारवाई करण्यात आली नाही तर संसदेचे अधिवेशन चालू होण्याच्या दिवसापासून, म्हणजेच ७ जुलैपासून देशव्यापी निदर्शने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा खासदाराला काढून टाकण्याची मागणी घेऊन संसदेसमोरही उग्र निदर्शने करण्यात येणार आहेत.

***अखिल भारतीय जनवादी महिला संघटना** - मरियम ढवळे, किरण मोघे, सोन्या गिल, **भारतीय महिला फेडरेशन** - आशा मोकाशी, स्मिता पानसरे, प्रतिभा बोबडे, **भारतीय मुस्लिम महिला आंदोलन** - नूरजहाँ सफिया नियाझ, **आलोचना** - मेधा कोतवाल, **नारी समता मंच** - वीणा, **मुस्कान** - भारती कोतवाल, **स्त्री वाणी** - ज्युलिया जॉर्ज, **चेतना महिला विकास केंद्र** - असुंता, **यंग विमेन्स ख्रिश्चन असोसिएशन** - संगीता हरजानी, **व्यक्ती** - अनघा सरपोतदार, माया पंडित-नारकर, मनिषा गुप्ते, नागमणी राव, साधना नातू, संगीता ढमढेरे, विद्या कुलकर्णी.*

□□□